# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे – 401 107. दूरध्वनी : 022-28121455, * E-mail Id : tp@mbmc.gov.in


25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

Press Note (Letter) - 2026

जा.क्र.मनपा/नर/ ४०८३/२०२५-२०२६ दिनांक :- 23/03/2026

प्रति,
विभाग प्रमुख
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- जाहिर सुचना प्रसिद्धी करणेबाबत.

संदर्भ :- मा. महासभा ठराव क्र.17, दि.18/02/2026

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा ह्या 6 गावांसाठी MMRDA ने तयार केलेल्या विकास योजनेमधील आरक्षण क्र.20 "कत्तलखाना" हे प्रस्तावित आरक्षण रद्द करुन त्याऐवजी "म्युनिसिपल परपज" हे आरक्षण प्रस्तावित करणेकामी फेरबदल करण्यास मा. महासभा ठराव क्र.17 दि.18/02/2026 रोजीच्या ठरावान्वये मंजूरी दिलेली असून याबाबत जनतेच्या हरकती व सूचनासाठी सूचना प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

यास्तव सदरची मराठी व इंग्रजी भाषेतील सूचना सोबत जोडण्यात येत असून सदरची सुचना मिरा भाईंदर **महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर** व जास्ती खपाच्या **दोन मराठी व दोन इंग्रजी वृत्तपत्रात** प्रसिध्द करण्यात यावी व सदरच्या कार्यवाहीनंतर झालेल्या कार्यवाहीच्या छायाप्रती या कार्यालयास उलट टपाली पाठवुन देण्यात याव्यात.

(पु. म. शिंदे)
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सोबत :- जाहीर सुचनेची प्रत

प्रत - माहितीस्तव
स्विय सहाय्यक
मा. आयुक्त सो., दालन, मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
## ता. व जि. ठाणे

// सूचना //

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, 1974 (1975 चा महा. 4 था) अन्वये स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे ज्यांच्या उल्लेख "एमएमआरडीए" असा केलेला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे) चे कलम 40 च्या पोटकलम 1 अन्वये शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क.टिपीबी 4307/108/प्र.क्र.29/07/नवि-11, दिनांक 01/12/2007 अन्वये मौजे मनोरी, गोराई (बृहन्मुंबई महानगरपालिका हद्द) आणि उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा (मिरा भाईंदर महानगरपालिका हद्द) या गावांसाठी सदर अधिसूचनेमध्ये उल्लेखिलेल्या क्षेत्रासाठी (यापुढे याचा उल्लेख उक्त "अधिसुचित क्षेत्र" असा केलेला आहे), मंजूर प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार मनोरंजन आणि पर्यटन विकास विभागाच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम 31 च्या पोटकलम (1) अन्वये उक्त अधिसूचित क्षेत्राच्या विकास आराखडयास अधिसूचना क्रमांक सिएमएस/टिपीबी-4312/प्र.क्र.23/2013/नवि-11 दिनांक 13 मे 2013 व दिनांक 3 जून 2016 अन्वये मंजूरी दिलेली आहे. (यापुढे याचा उल्लेख उक्त "मंजुर विकास योजना" असा केला आहे)

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असून संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे उक्त मंजुर विकास योजनेची अंमलबजावणी करु शकणार असल्याने एमएमआरडीए ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन राहत नसल्याने शासनाने, क्र.टिपीबी-4316/प्र.क्र.257/2016/नवि-11 दि.16/03/2017 रोजीच्या अधिसुचनेव्दारे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण या विशेष नियोजन प्राधिकरणाची नियुक्ती रद्द करुन सदर क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणुन संबंधित महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे.

ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेने (यापुढे याचा उल्लेख "उक्त नियोजन प्राधिकरण" असा केला आहे), तिच्या अधिपत्याखालील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा क्षेत्राची (यापुढे याचा उल्लेख "उक्त क्षेत्र" असा केला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे), चे कलम 38 सह कलम-23(1) अन्वयेच्या तरतूदीनुसार प्रारुप सुधारीत विकास योजना, (यापुढे याचा उल्लेख "उक्त प्रारुप विकास योजना" असा केला आहे), तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-2 मध्ये दि.13 मार्च, 2024 रोजी जाहिर केला आहे;

आणि ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सुचना / हरकती मागविणेकरीता उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह शासन राजपत्रात दि.24/09/2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे;

ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौजे उत्तन, येथील स. क्र. 242 पै., 282 पै., 283 अ पै. या जमिनीवर आरक्षण क्र. 20 "कत्तलखाना" असे आरक्षण (क्षेत्रफळ 3673.00 चौ. मी.) प्रस्तावीत करण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 26(1) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप सुधारीत विकास योजनेमध्ये सदर ठिकाणी आरक्षण क्र. 30 "कत्तलखाना" (क्षेत्रफळ 4,700.00 चौ. मी.) असे आरक्षण कायम ठेवून प्रस्तावित करण्यात आलेले आहे;

ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्व जात, धर्म पंथाचे नागरिक राहत असून त्यांना कत्तलखान्याची आवश्यकता नाही. सदर आरक्षणास स्थानिक नागरिकांकडून तीव्र विरोध दर्शविण्यात आलेला असल्याने उक्त मंजुर विकास योजनेमधील मौजे उत्तन येथील स. क्र. 242 पै., 282 पै., 283 अ पै. या जमिनीवरील आरक्षण क्र. 20 "कत्तलखाना" (क्षेत्रफळ 3673.00 चौ. मी.) हे आरक्षण वगळून त्याऐवजी "म्युनिसिपल परपज" असे आरक्षण प्रस्तावित करण्यास मा. महासभेने ठराव क्र. 17 दि. 18/02/2026 अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम 37(1) अन्वये मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, मौजे उत्तन येथील उक्त सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीवरील उक्त मंजुर विकास योजनेमधील आ.क्र. 20 "कत्तलखाना" हे आरक्षण वगळुन त्याऐवजी "म्युनिसिपल परपज" असा फेरबदल उक्त अधिनियमाचे कलम 37(1) अन्वये प्रस्तावित करण्यात येत आहे. (यापुढे याचा उल्लेख "उक्त प्रस्तावित फेरबदल" असा केला आहे);

त्याअर्थी, "उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत" ज्या नागरीकांना हरकती किंवा सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी हरकती / सूचना लेखी स्वरुपात सदरची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून 30 दिवसाच्या मुदतीपर्यंत सादर कराव्यात, म्हणजे सदर फेरबदलाच्या प्रस्तावास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी उक्त सूचना / हरकतींचा विचार करता येऊ शकेल.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी व माहितीसाठी, महानगरपालिका, मुख्य कार्यालयात व नगररचना विभाग, स्वामी विवेकानंद भवन, कनाकिया, मिरारोड (पूर्व), ता.जि.ठाणे 401107 या ठिकाणी कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आला आहे.

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

**MAIN BRANCH, BHAINDAR (W)**

**LATE INDIRA GANDHI BHAWAN, CHHATRAPTTI SHIVAJI MAHARAJ MARG,**

**BHAINDAR (W), TQ. & DIST. THANE 401 101**

# NOTICE

**(UNDER SECTION 37 OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT-1966)**

Whereas, the Government of Maharashtra has appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as its acronym "MMRDA") established under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974(Mah. IV of 1975) to be the Special Planning Authority by the state Government in Urban Development Department's Notification No.TPB 4307/108/CR- 29/07/UD-11 Dated 1 December 2007 promulgated in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 40 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966(hereinafter referred to as "the said Act") for the area of villages Manori & Gorai (Municipal Corporation of Greater Mumbai) and Uttan, Pali, Chowk, Tarodi, Dongari, Morva (Mira Bhaynader Municipal Corporation) notified in the schedule of the said Notification (hereinafter referred to as Notified Area"), to be developed as Recreation and Tourism Development Zone as per proposal of Sanctioned Regional Plan;

And whereas, under sub-section (1) of Section 31 of the said Act, the Government of Maharashtra by its Notification No. TPB-4312/323/CR-23/2013/UD-11, dated the 13/05/2013 and dated the 03/06/2016 has sanctioned the Development Plan of Notified Area (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan") submitted by the MMRDA;

And whereas, as the Notified Area falls in the limit of Municipal Corporation of Greater Mumbai and Municipal Corporation of Mira Bhayandar, (hereinafter referred to as the "said planning authority") and the concerned Municipal Corporations are implementing their sanctioned Development Plan as a Planning Authority, therefore to continue the appointment of MMRDA as a Special Planning Authority for implementation of the said Plan is no more required, the concerned Municipal Corporations shall implement the said plan along with their sanctioned Development Plans. Therefore, the Government Cancelled the appointment of MMRDA as special Planning Authority vide notification no. TPB-4316/P.no.257/2016/UD-11 dated 16/03/2017 for the said notified area, and the said area merge it, in the area of respective jurisdiction of the said Conserned Plannning Authority.

And whereas, the Mira Bhayandar Municipal Corporation (hereinafter referred to as the "said planning authority") had declared its intention to Revision of Draft Development Plan of of Villages-Uttan, pali, Chowk, Tarodi, Dogri & Morva included in Mira Bhayandar Municipal Corporation, (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said "area" ) as per the provision of section 38 read with section 23(1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966. (hereinafter referred to as the "said Act") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette extra-ordinary Part II on 13th March 2024.

And whereas, the Mira Bhayandar Municipal Corporation has published the said draft development plan, along with the development plan report in the Government Gazette on 24/09/2025 for inviting suggestions / objections from the public under section 26(1) of the said Act.

Whereas, in the said Sanctioned Development Plan, Reservation bearing No. 20 "Slaughterhouse" admeasuring 3,673.00 sq. m. has been proposed on land bearing Survey Nos. 242 (pt.), 282 (pt.), and 283A (pt.) situated at Mouje Uttan;

And whereas, in the Draft Revised Development Plan published under Section 26(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, the said reservation has been continued and proposed as Reservation No. 30 "Slaughterhouse" with an area of 4,700.00 sq. m.;

And whereas, the Mira Bhayandar Municipal Corporation area comprises citizens of all castes, creeds, and religions, and there is no requirement for a slaughterhouse at the said location, and strong objections have been raised by the local residents against the said reservation. Therefore, the General Body, Mira Bhayandar Municipal Corporation vide Resolution No. 17 dated 18/02/2026, has Passed to carry out modification under Section 37(1) of the said act, to delete Reservation No. 20 "Slaughterhouse" admeasuring 3,673.00 sq. m. on land bearing Survey Nos. 242 (pt.), 282 (pt.), and 283A (pt.) situated at Mouje Uttan of the said sanctioned Development Plan, and the same is to be redesigned as "Municipal Purpose"

And whereas, the modification has been proposed to delete the said Reservation No. 20 "Slaughterhouse" and the same is to be redesigned as "Municipal Purpose" in the said land is hereby proposed under Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said proposed modification");

And accordingly, the citizens who have objections or suggestions regarding the above-mentioned "proposed modification" should submit their objections/suggestions in writing within 30 days from the date of publication of the said notice in the Government Gazette, so that the said suggestions/objections can be considered before finalizing the proposal for the said modification.

The plan showing the proposed modification is available for inspection by the public during office hours at the office of the Municipal Corporation and at the Town Planning Department, Swami Vivekanand Bhavan, Kanakia, Mira Road (East), Taluka and District Thane – 401107.

**(Radhabinod A. Sharma, I.A.S.)**
**Commissioner**
**Mira Bhaindar Municipal Corporation**

PRESS NOTE (Legal) - 2026 - Adhisuchana (LEGAL)